असा. क्र. ५७ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**गुरूवार, डिसेंबर २१, २००६/अग्रहायण ३०, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८.—**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. .. .. .. .. | **३८८-३९२** |

दिनांक २१ डिसेंबर २००६ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८.

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **" महाराष्ट्र शासन राजपत्रात "** दिनांक २१ डिसेंबर २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९५९ चा मुंबई ३. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) अधिनियम, २००६ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.


[**किंमत** : रुपये ९.००]

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**२.** मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम ३ मध्ये, खंड (४) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— १९५९ चा मुंबई ३.

" (४क) " आयुक्त " याचा अर्थ, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम ६ अन्वये नियुक्त करण्यात आलेला महसूल विभागाचा आयुक्त, असा आहे ; ". १९६६ चा महा. ४१.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ८ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (१क) पंचायत प्रत्येक सहामाहीमध्ये एकदा, विकासविषयक कामांवर केलेल्या खर्चाचा अहवाल ग्रामसभेपुढे ठेवील आणि त्याची माहिती पंचायतीच्या सूचना फलकावर लावील. " ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये, " पोट-कलम (१) खाली " या मजकुराऐवजी, " पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (१क) खाली " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १४ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४ मधील, पोट-कलम (१) मध्ये, खंड (ज-२) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ज-३) ज्या व्यक्तीने शासकीय जमिनीवर किंवा सार्वजनिक मालमत्तेवर अतिक्रमण केले आहे अशी व्यक्ती ; किंवा ".

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३८ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३८ मधील, पोट-कलम (५) मध्ये, " पोट-कलमे (३) व (४) " या मजकुराऐवजी, " पोट-कलम (४) " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३९ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३९ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (१) आयुक्ताला,—

(एक) जो कोणताही सदस्य किंवा जो कोणताही सरपंच किंवा उप सरपंच आपली कर्तव्ये पार पाडताना केलेल्या गैरवर्तणुकीबद्दल किंवा कोणत्याही लांच्छनास्पद वर्तणुकीबद्दल किंवा आपले कर्तव्य करण्याबाबत दुर्लक्ष केल्याबद्दल किंवा आपले कर्तव्य पार पाडण्यास असमर्थ असल्याबद्दल दोषी असेल अथवा आपली कर्तव्ये

पार पाडण्यात दुराग्रहाने हेळसांड करीत असेल तर, अशा सदस्यास किंवा सरपंचास किंवा उप सरपंचास अधिकारपदावरून काढून टाकता येईल. अशाप्रकारे काढून टाकण्यात आलेल्या सरपंचाला किंवा उप सरपंचाला आयुक्ताच्या स्वेच्छानिर्णयानुसार पंचायतीतूनही काढून टाकता येईल ; किंवा

(दोन) जर गावातील ज्यांनी इमारती व जमिनी यांवरील कर व पाणी पट्टी यांच्या संबंधातील पंचायतीला देय असलेल्या सर्व रकमा चुकत्या केल्या असतील अशा एकूण मतदारांपैकी किमान वीस टक्के एवढ्या मतदारांनी, कलम ८ च्या पोट-कलम (१) किंवा (१क) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, वार्षिक लेखे व पंचायतीने विकासविषयक कामांवर केलेल्या खर्चाचा अहवाल ग्रामसभेसमोर ठेवण्यात आलेला नाही आणि त्याची माहिती सूचना फलकावर लावण्यात आलेली नाही अशी तक्रार केली तर, पंचायतीच्या सदस्याला, सरपंचाला किंवा, यथास्थिती, उप सरपंचाला अधिकार पदावरून काढून टाकता येईल :

परंतु, खंड (एक) च्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने किंवा खंड (दोन) च्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने निदेश दिल्याप्रमाणे उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने, आयुक्ताच्या आदेशान्वये, संबंधित पंचायतीला व व्यक्तीला रीतसर नोटीस देऊन त्यानंतर चौकशी केलेली असल्याखेरीज आणि संबंधित व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिलेली असल्याखेरीज आणि त्यानंतर, संबंधित मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने किंवा, यथास्थिति, उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यामार्फत आपला अहवाल आयुक्तास सादर केलेला असल्याखेरीज, अशा कोणत्याही व्यक्तीस अधिकारपदावरून काढून टाकण्यात येणार नाही. चौकशी अधिकारी एका महिन्याच्या आत त्याचा अहवाल सादर करील :

परंतु आणखी असे की, आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने किंवा, यथास्थिति, उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने सादर केलेल्या अहवालावर, तो मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, संबंधित व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, निर्णय घेईल.'';

(ख) पोट-कलमे (२) आणि (३) ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :—

''(२) आयुक्ताला, तशाच शर्तीला अधीन राहून, जिने सदस्य, सरपंच किंवा उप सरपंच म्हणून आपल्या अधिकारपदाचा राजीनामा दिला असेल व जी पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कृतींबद्दल व अकृतींबद्दल दोषी असेल अशा कोणत्याही व्यक्तीला, पाच वर्षांहून अधिक नसेल एवढ्या कालावधीसाठी अपात्र ठरवता येईल.

(३) पोट-कलम (१) किंवा (२) खाली आयुक्ताने दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कालावधीत, राज्य शासनाकडे अपील करता येईल आणि शासन, असे अपील प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत त्यावर निर्णय घेईल.''.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ यामध्ये कलम ३९क समाविष्ट करणे.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३९ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

चौकशीचे निदेश देण्याचा शासनाचा अधिकार.

" **३९क.** (१) कलम ३९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, स्वाधिकारे अथवा कलम ३९ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कृतीच्या किंवा अकृतीच्या बाबतीत कोणताही सदस्य, सरपंच वा उप सरपंच यांच्याविरुद्ध त्याच्याकडे केलेल्या अर्जावरून, संबंधित मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, त्या सदस्याची, सरपंचाची किंवा, यथास्थिति, उप सरपंचाची चौकशी करण्याचा आणि एक महिन्याच्या आत आपला अहवाल आयुक्ताला सादर करण्याचा निदेश देता येईल.

(२) आयुक्त, त्या पंचायतीला आणि संबंधित व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, एक महिन्याच्या आत त्या चौकशी अहवालावर निर्णय देईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये आयुक्ताने दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस शासनाकडे, तो आदेश त्याला मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत अपील करता येईल आणि शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.".

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५३ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५३ मध्ये,—

(क) पोट-कलम (२) मध्ये पुढील मजकूर शेवटी जादा दाखल करण्यात येईल :—

" पंचायतीच्या निदर्शनास आल्यानंतर किंवा निदर्शनास आणून दिल्यानंतर, पंचायतीने तात्काळ, वर नमूद केलेली कार्यपद्धती अनुसरुन, असा अडथळा किंवा अतिक्रमण काढून टाकणे हे पंचायतीचे कर्तव्य असेल. " ;

(ख) पोट-कलम (२-क) मध्ये,—

(एक) " विहित करण्यात येईल अशा अवधीत " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) " त्या पोट-कलमात तरतूद केल्याप्रमाणे कार्यवाही करता येईल. " या मजकुराऐवजी " त्या पोट-कलमात तरतूद केल्याप्रमाणे कार्यवाही करून त्या विषयीचा अहवाल आयुक्तांना सादर करता येईल. " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (३-क) मध्ये, " स्थायी समितीकडे अपील " या मजकुराने सुरू होणाऱ्या व " असे आदेश देईल. " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी " आयुक्ताकडे अपील करता येईल व आयुक्त, त्याला आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, अशा व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्याला आवश्यक वाटतील असे आदेश देईल. " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५७ ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५७ मध्ये,—

(क) पोट-कलम (३) मध्ये " कलम ३८, पोट-कलम (५) च्या तरतुदींच्या अधीनतेने, ग्रामनिधी, ग्राम पाणीपुरवठा निधी आणि पंचायतीच्या नावे, वेळोवेळी मिळणाऱ्या इतर रकमा यांच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी, सचिव संपूर्णपणे जबाबदार असेल आणि त्यातील

रकमांचा, तो खालील प्रयोजनांसाठी विनियोग करील '' या मजकुराऐवजी '' ग्रामनिधी, ग्राम पाणीपुरवठा निधी आणि पंचायतीच्या नावे, वेळोवेळी मिळणाऱ्या इतर रकमा यांच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी, सचिव आणि सरपंच संयुक्तपणे जबाबदार असतील आणि त्यातील रकमांचा, ते खालील प्रयोजनांसाठी विनियोग करतील '' हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (४) मध्ये,—

(एक) '' त्याच्या नियंत्रणाखालील '' हा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) '' सरपंचाला '' या मजकुराऐवजी '' पंचायतीला '' हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ यामध्ये कलम ६०क समाविष्ट करणे.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६० नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

सचिवाची विवक्षित कर्तव्ये.

'' **६०क.** (१) सचिवाकडे सोपविलेल्या इतर कोणत्याही कर्तव्यांव्यतिरिक्त, कलम ८ च्या पोट-कलम (१क) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, ग्रामसभेपुढे ठेवण्यासाठी, पंचायतीने विकासविषयक कामांवर केलेल्या खर्चाचा अहवाल तयार करणे आणि त्याची माहिती पंचायतीच्या सूचना फलकावर लावणे हे सचिवाचे कर्तव्य असेल.

(२) पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, ग्रामसभेपुढे ठेवण्यासाठी पंचायतीने विकासविषयक कामांवर केलेल्या खर्चाचा अहवाल तयार करण्यात आणि त्याची माहिती सूचना फलकावर लावण्यात सचिवाने कसूर केल्यास, तो सचिव, महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त आणि अपील) नियम, १९६४ च्या नियम ४ च्या खंड (पाच), (सहा) किंवा (सात) अन्वये त्याच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई केली जाण्यास पात्र असेल.''.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. १११ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**गुरुवार, डिसेंबर २१, २००६ / अग्रहायण ३०, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Village Panchayats (Amendment) Act, 2006 (Mah. Act No. XXXVIII of 2006), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

**MAHARASHTRA ACT No. XXXVIII OF 2006.**

*(First published, after having received the assent of the Governor, in the " Maharashtra Government Gazette ", on the 21st December 2006).*

An Act further to amend the Bombay Village Panchayats Act, 1958.

Bom. III of 1959.

WHEREAS, it is expedient further to amend the Bombay Village Panchayats Act, 1958, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Fifty-seventh Year of the Republic of India as follows :—

Short title.

**1.** This Act may be called the Bombay Village Panchayats (Amendment) Act, 2006.

Amendment of section 3 of Bom. III of 1959.

**2.** In section 3 of the Bombay Village Panchayats Act, 1958 (hereinafter referred to as " the principal Act"), after clause (*4*), the following clause shall be inserted, namely :— Bom. III of 1959.

"(*4A*) " Commissioner " means the Commissioner of a revenue division appointed under section 6 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 ; ". Mah. XLI of 1966.

Amendment of section 8 of Bom. III of 1959.

**3.** In section 8 of the principal Act,—

(*a*) after sub-section (*1*), the following sub-section shall be inserted, namely :—

" (*1A*) The *panchayat* shall place the report of the expenditure incurred on the development activities before the *Gram Sabha* once in every six months, and display the information thereof on the notice board of the *panchayat.* " ;

(*b*) in sub-section (*2*), for the words, brackets and figure " under sub-section (*1*) " the words, brackets, figures and letter " under sub-section (*1*) or sub-section (*1A*) " shall be substituted.

Amendment of section 14 of Bom. III of 1959.

**4.** In section 14 of the principal Act, in sub-section (*1*), after clause (*j-2*), the following clause shall be inserted, namely :—

" (*j-3*) has encroached upon the Government land or public property ; or ".

Amendment of section 38 of Bom. III of 1959.

**5.** In section 38 of the principal Act, in sub-section (*5*), for the words, brackets and figures "sub-sections (*3*) and (*4*) " the words, brackets and figure " sub-section (*4*) " shall be substituted.

Amendment of section 39 of Bom. III of 1959.

**6.** In section 39 of the principal Act,—

(*a*) for sub-section (*1*), the following sub-section shall be substituted, namely :—

" (*1*) The Commissioner may,—

(*i*) remove from office any member or any *Sarpanch* or *Upa-Sarpanch* who has been guilty of misconduct in the discharge of his duties, or of any disgraceful conduct, or of neglect of or incapacity to perform his duty, or is persistently remiss in the discharge thereof. A *Sarpanch* or an *Upa-Sarpanch* so removed may at the discretion of the Commissioner also be removed from the *panchayat ;* or

(*ii*) remove from office the member, *Sarpanch* or, as the case may be, *Upa-Sarpanch*, if not less than twenty per cent. of the total number of voters in the village who have paid all dues of the *panchayat* regarding taxes on buildings and lands and water charges, make a complaint that the annual accounts and the report of the expenditure incurred by the *panchayat* on the development

activities are not placed before the *Gram Sabha* ; and the information thereof is not displayed on the notice board as required by sub-section (*1*) or (*1A*) of section 8 :

Provided that, no such person shall be removed from office unless, in case of clause (*i*), the Chief Executive Officer or in case of clause (*ii*), the Deputy Chief Executive Officer as directed by the Chief Executive Officer ; under the orders of the Commissioner, holds an inquiry after giving due notice to the *panchayat* and the person concerned ; and the person concerned has been given a reasonable opportunity of being heard and thereafter the Chief Executive Officer or, as the case may be, the Deputy Chief Executive Officer concerned, through the Chief Executive Officer, submits his report to the Commissioner. The inquiry officer shall submit his report within a period of one month :

Provided further that, the Commissioner shall, after giving the person concerned a reasonable opportunity of being heard, take a decision on the report submitted by the Chief Executive Officer or, as the case may be, the Deputy Chief Executive Officer, within a period of one month from the date of receipt thereof. " ;

(*b*) for sub-sections (*2*) and (*3*), the following sub-sections shall be substituted, namely :—

" (*2*) The Commissioner may subject to like condition disqualify for a period of not exceeding five years, any person who has resigned his office as a member, *Sarpanch* or *Upa-Sarpanch* and has been guilty of the acts and omissions specified in sub-section (*1*).

(*3*) Any person aggrieved by an order of the Commissioner under sub-section (*1*) or (*2*) may, within a period of fifteen days from the date of the receipt of such order, appeal to the State Government and the Government shall decide the appeal within a period of one month from the date of receipt thereof. ".

**7.** After section 39 of the principal Act, the following section shall be inserted, namely :— Insertion of section 39A in Bom. III of 1959.

" **39A.** (*1*) Notwithstanding anything contained in section 39, the State Government may, *suo motu* or on an application made to it against any member, *Sarpanch* or *Upa-Sarpanch* regarding any act or omission specified in sub-section (*1*) of section 39, direct the Chief Executive Officer concerned to hold an inquiry against such member, *Sarpanch* or, as the case may be, *Upa-Sarpanch*, and submit its report, within a period of one month, to the Commissioner. Power of Government to direct inquiry.

(*2*) The Commissioner shall, after giving a reasonable opportunity of being heard to the *panchayat* and the person concerned, take a decision, within a period of one month, on the inquiry report.

(*3*) Any person aggrieved by an order of the Commissioner under sub-section (*2*), may, within a period of fifteen days from the date of receipt of such order, appeal to the State Government and the decision of the Government thereon shall be final. ".

Amendment of section 53 of Bom. III of 1959.

**8.** In section 53 of the principal Act,—

(*a*) in sub-section (*2*), the following shall be added at the end, namely :—

" It shall be the duty of the *panchayat* to remove such obstruction or encroachment immediately after it is noticed or brought to its notice, by following the procedure mentioned above. " ;

(*b*) in sub-section (*2A*),—

(*i*) the words " within such time as may be prescribed " shall be deleted ;

(*ii*) for the words " provided in that sub-section " the words "provided in that sub-section, and submit the report thereof to the Commissioner " shall be substituted ;

(*c*) in sub-section (*3A*), for the words " appeal to the Standing Committee and the Standing Committee, after making such enquiry as it thinks necessary, shall pass such orders as it deems necessary " the words " appeal to the Commissioner and the Commissioner, after making such enquiry as he thinks necessary, shall pass such orders as he deems necessary " shall be substituted.

Amendment of section 57 of Bom. III of 1959.

**9.** In section 57 of the principal Act,—

(*a*) in sub-section (*3*), for the words, brackets and figures " Subject to the provisions of sub-section (*5*) of section 38, the Secretary shall be solely responsible for the safe custody of the village fund, the Village Water Supply Fund and other moneys received on behalf of the *panchayat*, from time to time, and shall operate them for the following purposes " the words " The Secretary and the *Sarpanch* shall be jointly responsible for the safe custody of the village fund, the Village Water Supply Fund and other moneys received on behalf of the *panchayat*, from time to time, and shall jointly operate them for the following purposes " shall be substituted ;

(*b*) in sub-section (*4*),—

(*i*) for the words, " *Sarpanch* " the word " *panchayat* " shall be substituted ;

(*ii*) the word " under his control " shall be deleted.

**10.** After section 60 of the principal Act, the following section shall be inserted, namely :— Insertion of section 60A in Bom. III of 1959.

**"60A.** (*1*) In addition to any other duties cast on the Secretary, it shall be the duty of the Secretary to prepare the report of the expenditure incurred by the *Panchayat* on the development activities to be placed before the *Gram Sabha* and display the information thereof on the notice board of the *Panchayat* as required by sub-section (*1A*) of section 8. Certain duties of Secretary.

(*2*) If the Secretary fails to prepare the report of the expenditure incurred on the development activities to be placed before the *Gram Sabha* and display the information thereof on the notice board as required by sub-section (*1*), he shall be liable for disciplinary action under clause (*v*), (*vi*) or (*vii*) of rule 4 of the Maharashtra Zilla Parishads District Services (Discipline and Appeal) Rules, 1964.".

असा. क्र. ५ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, जानेवारी २९, २००७/माघ ९, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद)**

### *ERRATA*

In the English translation of the Bombay Village Panchayats (Amendment) Act, 2006 (Mah. Act No. XXXVIII of 2006) published in the *Maharashtra Government Gazette,* Extraordinary, Part VIII, dated the 21st December 2006, at pages 836 to 840, on page 839,—

(1) in line 38, *for* " words, " *read* " word ";

(2) in line 40, *for* " word " *read* " words ".



शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई